ISSN 2231-1629 Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# मोदी अंतर्गत भारताचे परराष्ट्रीय धोरण

**कल्पना डी. निकम**
*सहाय्यक प्राध्यापिका*
*राज्यशास्त्र विभाग*
*लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय,पंचवटी,नाशिक*

इतिहास हा जनतेची सहमती असलेल्या भूतकाळाचे कथन आहे, हे जग आपल्याला नव्याने विचार करण्याची हाकच देत नाही, तर देशात नव्याने मतैक्य घडवण्याचेही आवाहन करते. जुनी मतप्रणाली मागे ठेवणे ही या प्रवासाची सुरुवात ठरेल.

-नेपोलियन

**गोषवारा:**

*कोणत्याही देशासाठी परराष्ट्र धोरण अत्यंत महत्वाचे असते.परराष्ट्र धोरणाद्वारेच एखादा देश दुसऱ्या देशाशी चांगले संबंध प्रस्थापित करून आपले राष्ट्रीय हित साधत असतो. परराष्ट्रीय धोरणाची सामान्यतः असंख्य अशी उद्दिष्टे असतात ज्यात राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, दहशतवादाला आळा घालणारी मुद्दे आणि जागतिक व्यवस्था राखणे यांसारख्या महत्वाच्या मुद्द्यांचा समावेश असतो.या व्यतिरिक्त, कोणत्याही देशाचे परराष्ट्रीय धोरण हे त्याच्या अंतर्गत आणि बाह्य वातावरणाच्या आधारे निश्चित केले जाते; ज्यामध्ये राष्ट्रीय हेतू, भौगोलिक स्थान, ऐतिहासिक वारसा, व्यक्तिमत्त्व आणि विचारधारा देखील मोठ्या प्रमाणावर योगदान देत असतात. तसेच राजकीय उत्तरदायित्व, सामाजिक रचना आणि आंतरराष्ट्रीय करारामध्ये देशाचा सहभाग देखील त्या देशाच्या परराष्ट्रीय धोरणात अत्यंत महत्वपूर्ण व चोख भूमिका बजावत असतात.जगातील प्रत्येक राष्ट्रासाठी त्यांनी ठरवलेले परराष्ट्र धोरण हे अत्यंत महत्वाचे असते. परराष्ट्रीय धोरणातूनच एखाद्या राष्ट्राचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय हेतू दडलेले असतात. सुमारे १३५ कोटी लोकसंख्या असलेल्या भारत देशात १९४७ पासून ते आजतागायत अनुक्रमे तीन टप्प्यांमध्ये परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप स्पष्टपणे दिसते.स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू सरकार यांच्या परराष्ट्रीय धोरणापासून ते आज असलेल्या १५ वे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार २.० पर्यंतची परराष्ट्रीय व्यवहार बदललेले दिसून येते. तत्पूर्वी भारतीय विदेश नीतीचे पाच मूलभूत सिद्धांत जाणून घेण्याची आवश्यकता आहे ते खालीलप्रमाणे आहेत:*

1. *एकमेकांच्या प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्वचा आदर राखणे.*
2. *परस्पर हल्ला न करणे*
3. *एकमेकांमध्ये हस्तक्षेप न करणे*
4. *समानता आणि परस्पर लाभ*
5. *ततापूर्ण सहअस्तित्व*

**परिचय:**

भारताला परराष्ट्र धोरण, राजनय आणि मुसत्तेगिरीची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. ती प्राचीन काळी सुरू झाली आणि आजतागायत चालूच आहे. अखंड भारताचे शिल्पकार आचार्य चाणक्य यांना भारतीय मुसद्दी परंपरेचे जनक मानले जाते. वसाहती काळातही ब्रिटिश भारताने काही धोरण शेजारील हितसंबंधाद्वारे ठरवले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यानंतर परराष्ट्रीय धोरणाची व्याख्या देशनिहाय करण्यात आली. परराष्ट्र धोरणाचा उद्देश भारताच्या हिताचे रक्षण आणि संवर्धन करणे आहे. या व्यतिरिक्त, भारतीय परराष्ट्रीय धोरणात शेजारील राष्ट्रान्समवेत शांतता प्रस्थापित करणे, व्यापार वाढवणे, परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे आणि जागतिक पटलावर प्रमुख भूमिका बजावणे यांसारख्या उद्दिष्टांचा समावेश आहे. यात हे लक्षात घेण्यासारखे आहे की,भारताचे परराष्ट्र धोरण भारताद्वारे जुन्या पैलूंवर आधारित आहे जसे की, "जग हे एक कुटुंब आहे".

२०१४ तसेच २०१९ साली लोकसभेत निवडून आलेल्या नरेंद्र मोदी सरकारचा ७ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे. सुरुवातीलाच लगेचच ६० पेक्षाही जास्त राष्ट्रांच्या भेटीमुळे परराष्ट्रीय मुद्द्यांवर फारसे लक्ष वेधले गेले.

**मोदींच्या कार्यकलादरम्यानच्या भारतीय परराष्ट्र धोरण (२०१४-२०२१)**

जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे २०१४ रोजी देशाची सूत्रे हातात घेतली,तेव्हा त्यांच्या परराष्ट्र धोरणाची मुख्य उद्दिष्टे भारताची चांगली प्रतिभा निर्माण करणे आणि

भारताला जागतिक मंचावर उदयोन्मुख शक्ती म्हणून दाखविणे, ज्या अंतर्गत त्यांनी जगभरातील सरकारांसमोर "मेक इन इंडिया" चा प्रस्ताव ठेवला. यामुळे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (एफ.डी.आय) याच्या नियमांमध्येही बदल करण्यात आले. नवीन परराष्ट्र धोरणाअंतर्गत परदेशी वास्तव्य करत असलेल्या भारतीयांशीही संबंध वाढवले. शेजाररील प्रथम (Neighbors first) या धोरणावर काम करत एन डी ए सरकारने सार्क देशांना शपथविधी सोहळ्यासाठी खास आमंत्रित केले होते. एन डी ए सरकारने आपल्या पहिल्या कार्यकाळात 'विकसित परराष्ट्रीय धोरण'या तत्वांवर काम केले आहे, यामुळे भारतीय मुसद्देगिरी मजबूत झालेली आहे. विद्यमान सरकारने जागतिक स्तरावर जुन्या सरकारांनी सोडवलेल्या प्रश्नांना प्राधान्य देऊन एक पाऊल पुढे नेले आहे. या कामांमध्ये बांगलादेश सोबतचा भू-सीमा करार आणि अमेरिकेशी नागरी अणू करार यांसारख्या महत्वाच्या प्रश्नांचा समावेश होता. याशिवाय या सरकारने युरोपियन देश व भारताच्या संबंधावर परिणाम करणाऱ्या 'इटालियन मरीन केस'च्या मुद्द्यावर लक्ष दिले. या प्रकरणामुळे भारताला मिसाईल टेक्नोलॉजी कंट्रोल रेजिम(MTCR) मध्ये सामील होण्यापासून रोखत होता.

एन डी ए च्या कार्यकाळात, अफगाणिस्तान आणि श्रीलंका सोबत आपले सबंध सुधारले असताना नेपाळ, पाकिस्तान आणि चीनसारख्या देशांशी भारताचे संबंध हे अत्यंत ताणले गेले आहेत यातूनच अनेक तणावाच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले आहेत. नेपाळच्या बाबतीत तेथील नवीन राज्यघटनेने काठमांडू आणि दिल्ली यांच्यात दुरावा निर्माण केला आहे व मधेच नाकाबंदी मूळे अजून तनाव वाढला आहे. नेपाळ सद्यस्थितीत भारतापासून दूर दूर जात आहे व चीन सोबत चांगले संबंध प्रस्थापित करत आहे. मौरिशस आणि सेशेल्स देशाच्या बेटामध्ये पंतप्रधानांनी केलेल्या दौऱ्यामुळे हिंदी महासागर क्षेत्रात भारताचा मजबूत पाया आणखी भक्कम झाला. ९०च्या दशकात असलेल्या लूक इस्ट पौलिसी वर काम करत असताना एन डी ए सरकारने ॲक्ट इस्ट चीही घोषणा केली त्यामुळे दक्षिण-पूर्व आशियात भारताची पकड आणखी घट्ट झाली आहे.

**ॲक्ट ईस्ट धोरण:**

ॲक्ट ईस्ट धोरण म्हणजे दक्षिण-पूर्ण आशियायी राष्ट्रांसोबत व्यापार आणि गुंतवणूक संबंधी भारत उत्सुकता दाखवतो. आशिया पॅसिफिक क्षेत्रात असलेल्या देशांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने भारताने ॲक्ट ईस्ट हे धोरण आणले-

१) प्रादेशिक ,द्विपक्षीय आणि बहुपक्षीय करारावद्वारे भारत आणि आशिया-प्रशांत महासागर क्षेत्रांमध्ये आर्थिक सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि सामाजिक संबंध प्रस्थापित करणे.

२) भारतातील ईशान्य भारतातीय राज्ये आणि त्यांच्या शेजारील राष्ट्रांमध्ये सौदार्यपूर्ण संबंध विकसित करणे.

३) भारतातील पारंपरिक व्यापारी भागीदारांपेक्षा उदयोन्मुख आग्नेय-आशियायी देशांनव्यतिरिक्त पॅसिफिक प्रदेशातील देशांशी व्यापार संबंधांना प्राधान्य देणे.

**परराष्ट्रीय धोरणात असलेल्या विविध राष्ट्रांसोबतचे संबंध:**

१) **भारत-अमेरिका संबंध-**

अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार आल्यापासून दोन्ही राष्ट्रे एकमेकांसोबत संबंध सुधारण्यात गुंतले होते. भारत-अमेरिका संबंध हे राजनीतिक दृष्टीने यशस्वी झाले आहेत. दोन्ही देशांनी संरक्षण, सहकार्य, मूलभूत रसद करार आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सहकार्यासह अनेक मुद्ययावर प्रगती केली आहे. विद्यमान जो बाईडेन सरकार मूळे थोडेफार संबंध दुरावल्याचे जाणवले असले तरी येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की अमेरिका हे क्वाड ग्रुप चा सदस्य आहे. तथापि, जागतिक व्यापारातील वातावरणात चाललेल्या स्पर्धेमुळे भारत-अमेरिका यांच्यातील व्यापरावरही परिणाम होऊ शकतो.

**२) भारत-रशिया संबंध-**

रशिया भारताचा सर्वात जुना व विश्वासू मित्र देश आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियावर काही निर्बंध लादल्यानंतर भारत-रशिया संबंधात अनेक ताण पडत होते. परंतु पंतप्रधान मोदींनी रशियाच्या राष्ट्ध्यक्षांशी अनौपचारिक चर्चा करून निर्माण होणाऱ्या अडथळ्यांना पूर्णविराम दिला.त्याचबरोबर रशिया आणि चीनसोबत ओसाका येथे झालेल्या G20 बैठकीत ते दहशतवादविरोधी आणि हवामानबदल च्या मुद्द्यावर देखील भेटले.तथापि अलीकडच्या काळात रशिया-भारत यंदारम्यानचे संबंध थोडेफार विस्कटलेले आहेत. कारण भू-राजकिय गतिशीलतेत बदल झाल्या कारणाने भारत-अमेरिकेचे संबंध वाढले आहेत आणि यामुळे चीन, पाकिस्तानसोबत रशियाचे संबंध वाढले आहे. विशेषतः संरक्षणविषयक बाबींमध्ये. भारत व रशियामध्ये भूदलासोबत इंद्र,

वायुदलासोबत अवाइंड्र-१४ तसेच नौदलासोबत इंद्रा एन ए व्ही हे सैन्याअभ्यास होत असतात.

**३) भारत-चीन संबंध-**

आशिया-पॅसिफिक क्षेत्र तसेच जागतिक राजकीय व व्यापारी पटलावर चीनचे वाढते वर्चस्व आणि त्याचा आक्रमक पवित्रा भारतासाठी नेहमीच डोकेदुखी राहिली आहे. भारत आणि चीन डोकलाम च्या वादावरून समोरासमोर आले होते आणि या वादामध्ये भारताच्या मजबूत मुसतद्देगिरी मुळे चीनला माघार घ्यावी लागली. तदनंतर दोन्ही देशांमध्ये अनौपचारिक बैठकही झाली ज्यामध्ये दोन्ही राष्ट्रांनी शांतता व सलोखा राखण्यासाठी चर्चा केली. त्याच वेळी भारत आणि भूताननेही चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिअटीव्ही(बी आर आय) योजनेपासून दूर केले ज्याचा प्रभाव संपूर्ण आशिया देशांवर वाढविणे आहे. चीन हा कर्ज देऊन त्या देशाला आर्थिक गोत्यात अडकवण्यात पटाईत आहे त्यामुळे येणाऱ्या काळात भारतासाठी चीनच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**४) भारत-जपान संबंध-**

२०१४ मध्ये सरकार स्थापन झाल्यापासून नरेंद्र मोदी आणि शिंजो आबे यांनी भारत आणि जपान या देशांदरम्यानचा संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यात ते बऱ्याच अंशी यशस्वी झालेले आहेत.सामाजिक सुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, प्रादेशिक सहकार्य एकत्रीकरण यांसारख्या धोरणात्मक मुद्द्यांवर दोन्ही देशाचे मते अतिशय सकारात्मक आहे. भारत -जपान संबंध आणखी सुधारण्यासाठी मोदींना चांगली संधी आहे.याव्यतिरिक्त, भारत,जपान, अमेरिका व ऑस्ट्रेलिया यांच्यात क्वाड फॉरमॅट अंतर्गत होणाऱ्या बैठका संस्थात्मक केल्या जातील. भारत-जपान दरम्यान सहयोग कैजिन हे सैन्यअभ्यास होत असते.

**५) दक्षिण-आशियातील राष्ट्रांसोबत संबंध-**

दक्षिण-आशियातील राष्ट्रांसोबत चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी नरेंद्र मोदींनी २०१४ ला शपथविधीसाठी सार्क देशातील राष्ट्रांना आमंत्रित केले होते. दक्षिण आशिया हा अत्यंत महत्त्वाचा भारताच्या दृष्टीने प्रदेश आहे ज्यामध्ये भारताला आपला सहभाग नोंदवायचा आहे, मात्र सार्क गटात पाकिस्तानच्या नकारात्मक वृत्तीमुळे नवीन सरकार बिम्सटेक देश आणि दक्षिण-पूर्व आशियातील देशावर लक्ष केंद्रित करत आहे. नवे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर आशिया क्षेत्रात विशेष लक्ष घालण्यात प्रयत्न करत आहेत. बिम्सटेक हा आशियान देशांशी संबंध निर्माण करण्याचा चांगला मार्ग आहे किर्गिस प्रजासत्ताक आणि मौरिशससह बिम्सटेक देशांच्या राष्ट्राध्यक्षांना मोदींनी शपथविधीला आमंत्रित करून राजनीतिक संदेश देण्याचा प्रयत्न केला असला तरी यावर जास्त काम करण्याची गरज आहे. मात्र भारताचा शेजारील देश पाकिस्तानशी असलेले संबंध पूर्वीसारखेच कडू आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादामुळे भारताचे पाकिस्तानशी संबंध बिघडले आहे. भारताने आता पाकिस्तानकडून मोस्ट फेव्हर नेशन(एम एफ एन) हा दर्जा मागे घेतला आहे.

**६) मध्य पश्चिम आशियातील राष्ट्रांसोबत संबंध-**

भारतीय पंतप्रधानांनी शेवटच्या सत्रात सौदी अरेबिया, दुबई, कतार आणि इस्राएल या मध्य पश्चिम आशियातील देशांशी चांगले संबंध निर्माण केले आहेत. या संबंधामुळे पंतप्रधान मोदी या सत्रातदेखील परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊ शकतात. तथापि, अमेरिकेने इराणवर लादलेल्या तेलाच्या निर्बंधांमुळे भारताला समस्यांना सामोरे जावे लागत आहे आणि अमेरिकेसोबतच्या संबंधामुळेही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अलीकडेच सौदी अरेबिया चे राजकुमार भारत दौऱ्यावर आले होते. क्रावून प्रिंसने आपल्या भारत दौर्यादरम्यान १०० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीच्या करारावर सहमती दर्शीवली होती. भारत आणि सौदी अरेबिया दरम्यान एकूण पाच करारावर स्वाक्षऱ्या झालेल्या आहेत. यात गुंतवणूक, पर्यटन, गृहनिर्माण, माहिती आणि प्रसारण क्षेत्रात झाली.

**७) आफ्रिका खंडातील राष्ट्रांसोबत संबंध-**

आफ्रिका खंडातील व्यापार, धोके, सागरी सुरक्षा,हवामान बदल, दहशतवादी विरुद्ध प्रयत्न,आफ्रिकेत हायड्रोकार्बोन, लिथिअम भांडाराची उपस्थिती आणि सद्यस्थितीत चीनचे आफ्रिका खंडात वाढत चाललेली जवळीक यामुळे भारताचे परराष्ट्रीय धोरण आफ्रिका खंडात आणखीनच सुधार करण्याचा व चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. ज्या अंतर्गत भारत सरकारने २०१८-१९ मध्ये ५ आफ्रिकन देशांमध्ये दूतावास बांधले आहेत. तसेच, आपले परराष्ट्रीय धोरण आणखी सुधारण्यासाठी, २०१९-२० मध्ये भारताने आफ्रिकेत अनेक राजनीतिक मोहीम सुरू केल्या होत्या, त्याअंतर्गत आफ्रिकेत नवीन भारतीय दूतावास उभारण्यात येणार आहेत. या खंडातील

व समुद्री क्षेत्रातही दबदबा वाढवण्यासाठी सध्याचे सरकार खूप प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

**बदलत चाललेली भारतीय परराष्ट्रीय धोरण:**

१) भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वीच्या सर्व धोरणांच्या तुलनेत त्यात सर्वाधिक जोखीम घेण्याची प्रवृत्ती आहे.

२) भारत आपल्या जुन्या चालत आलेल्या संरक्षणात्मक धोरण बदलून थोड्या आक्रमक धोरणाकडे वाटचाल करीत आहे.

३) भारताच्या सध्याच्या धोरणात विचार आणि कृतीची स्पष्टता दिसून येते.

४) बदलत्या जागतिक राजकीय वातावरणात,भारत आपल्या आर्थिक व राजकीय हहितसंबंधाच्या पूर्ततेसाठी कोणत्याही औपचारिक गटावरील अवलंबित्व मर्यादित करत आहे.

**भारताने स्वय: लादलेले अलगाव-**

भारत सध्या दोन महत्वाच्या आंतरराष्ट्रीय संस्थापसून अलिप्त आहे.नॉन-अलाइण्ड मोव्हमेंट (NAM) आणि दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्यासाठी संघटना (SAARC) याचा भारत संस्थापक सदस्य होता.

१) याव्यतिरिक्त, भारताने प्रादेशिक व्यापारी आर्थिक भागीदारी (RCEP) करारापासून सध्या तरी दूर राहणेच पसंत केलेले आहे.

२) तथापि, ही स्वयं लादलेली अलिप्तता जागतिक शक्ती बनण्याच्या भारताच्या आकांक्षेशी जुळत नाही.

**परराष्ट्रीय धोरणात भारताची सर्वोच्च प्राथमिकता:**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या पी-५ देशांशी (अमेरिका, रशिया, चीन,ब्रिटन, फ्रांस, जर्मनी) असलेले संबंध भारताच्या परराष्ट्रीय धोरण निर्मात्यांसाठी प्रथम प्राथमिकता आहे.

**जागतिक महासत्ता-**

भारत हा जगात महासत्ता असलेल्या देशांना अत्यंत काळजीपूर्वक हाताळत आहे व संबंध संतुलित ठेवत आहे आणि त्याच्या देशांतर्गत विकासासाठी जास्तीत जास्त लाभ घेण्याचा प्रयत्न करीत आहे. यापूर्वी भारत हा भूतकाळात यु.एस.एस.आर. च्या जवळ राहिला आहे जो, त्याच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी खंबीरपणे उभा आहे. अमेरिका गेल्या दोन वर्षापर्यंत भारताच्या चांगल्या यादीत नक्कीच नव्हता. तथापि, चीनच्या दिवसेंदिवस वाढतच चाललेल्या प्रभुत्वामुळे भारत हा अमेरिकेबरोबर धोरणात्मक वाटचाल करण्यात अधिक प्रयत्नशील आहे. काही जागतिक पातळीवरील शक्तिशाली राष्ट्रे सोडता इतर काही राष्ट्रांसोबत भारताचे संबंध सतत उबदार राहिलेले आहे. ब्रिक्सच्या उदयासह भारत, जागतिक शक्तींशी अत्यंत काळजीपूर्वक वाटाघाटी करत आहे, स्वतःला भविष्यातील महासत्ता राष्ट्र म्हणून भारत वाटचाल करीत आहे.

**सारांश-**

संपूर्ण जग हे एक परिवार आहे असं मानणाऱ्या भारतासाठी परराष्ट्रीय धोरण हे अत्यंत महत्त्वाचे व प्रथमिकतापूर्ण आहे. २०१४ पासून ते आजपर्यंत नरेंद्र मोदी सरकारचा परराष्ट्रीय धोरणसंबंधात जास्त लक्ष दिले असले तरीही अनेक राष्ट्रांसोबत भारताचे शत्रुत्वही वाढले आहे. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर असलेल्या संबंधात खोलवर जाऊन नजर टाकल्यावर समजते की कोणतेही राष्ट्र हे एकमेकांचे कायमचे वैरी किंवा शत्रू नसतात त्याचप्रमाणे राष्ट्रे ही एकमेकांचे कायमचे मित्रही नसतात.या सर्व गोष्टींमध्ये परराष्ट्रीय धोरणे, मुसतद्देगिरी, राजनय आणि विद्यमान सरकारचे मानसिकता यांवरही अवलंबून असते. कारण याचा प्रभाव हा थेट संबंधित देशातील नागरिकांवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या पडत असतो. मोदी सरकारच्या अंतर्गत परराष्ट्रीय धोरण हे शेजारील राष्ट्रासाठी ताणतनावांचे असले तरी बहुतांश राष्ट्रांशी चांगले मैत्रीपूर्ण संबंध वाढल्याचे दिसून येते.

संदर्भ-

*१. आंतराष्ट्रीय राजकारण-शैलेंद्र देवळांकर*
*२. 'द हिंदू'वृत्तपत्र- संपादकीय*
*३. 'द इंडियन एक्सप्रेस' वृत्तपत्र- संपादकीय*
*४. ध्येय आय ए एस- आर्टिकल (मोदींच्या अंतर्गत भारतीय विदेश नीती)*
*५. www.mea.gov.in*
*६. लोकसत्ता- भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा आढावा*
*७. www.mod.gov.in*
*८. www.wikipedia.com*